दै. देशोन्नती दि. 10/03/2024

# बसने प्रवास करणाऱ्या महिलांचे दागिणे चोरी करणारी टोळी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, १४ गुन्हे उघड ; साडेसहा लाखांचा ऐवज जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ प्रवासादरम्यान महिलांचे दागिने चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. या प्रकरणात चौघांना अटक केली असून यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. ताब्यात घेतलेल्या या टोळीकडून ६ लाख ४६ हजार ९३४ रुपयांचा ऐवज जप्त केल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत शनिवारी दिली.

जिल्ह्यात बसस्थानक व शहरात प्रवास करतांना महिलांचे गळयातील व पर्समधील सोन्याचे दागिणे चोरीचे प्रमाण वाढल्याने चोरी करणारे गुन्हेगार यांचा शोध करणेकामी पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि यांना आदेश दिले होते. त्यानुसार पोनि उदय खंडेराय यांनी पोउपनि दत्तात्रय काळे यांची टिम तयार करुन जिल्ह्यातील बसमध्ये चढतांना व प्रवास करतांना महिलांचे दागिणे चोरी करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेवुन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने पोउपनि दत्तात्रय काळे व टिमने बसस्थानक, रेल्वेस्टेशन इतर विविध गर्दीच्या ठिकाणची माहिती घेऊन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रवासादरम्यान महिलांच्या गळयातील पोत चोरी करणारी एक महिला व तीन इसम दुर्गा हातवळने (२८) रा. रमाईनगर देगलुर, हिवराज उपाध्य (५१) रा. रमाईनगर देगलुर, बालाजी ऊर्फ बली कोळगीरे (३०) रा. देगाव रोड देगलुर, प्रकाश वाघमारे (३४) रा. कळसदाळ ता. भालकी ह.मु. देगलुर व एका महिलेस नांदेड बसस्थानक येथुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे विचारपुस करुन सखोल चौकशी केली असता त्यांनी वजिराबाद, इतवारा, शिवाजीनगर, बारड, कंधार, लोहा, माळाकोळी व माहुर हाद्दीत चोरी केल्याचे सांगीतले. रेकॉर्डची पाहणी केली असता एकुण १४ गुन्हे दाखल असल्याचे प्राथमिक तपासात दिसुन आले आहे. सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल एक रुद्राक्ष मण्याची माळ, मणी मंगळसूत्र, लॉकेट, मिनी गंठण, सोन्याचे पेंडॉल, चैन, अन्य सोन्याचे दागिणे असा एकूण ६ लाख ४६ हजार ९३४ रुपये किमतीचा ऐवज जप्त केल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले. यावेळी स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय, पोउपनि दत्तात्रय काळे उपस्थित होते. या पथकात पोउपनि दत्तात्रय काळे यांच्यासह कर्मचारी गंगाधर कदम, बालाजी तेलंग, विलास कदम, गणेश धुमाळ, रणधीरसिंघ राजबंश, गजानन बैंनवाड, महिला अंमलदार हेमलत्ता भोयर, पंचफुला फुलारी आदींचा समावेश होता.

दै. लोकमत

# दागिने लांबविणारी टोळी पकडली

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : बसप्रवासादरम्यान प्रवासी महिलांच्या गळ्यातील, तसेच पर्समधील दागिने लांबविणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडली आहे. चार जणांच्या या टोळीत एका महिलेचाही समावेश आहे. त्यांच्याकडून साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १४ गुन्हे उघडकीस आले आहेत, अशी माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली.



जिल्ह्यात बसने प्रवास करत असताना अनेक महिलांच्या गळ्यातील, पर्समधील दागिने चोरी जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. याबाबत पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सूचना देण्यात आल्या होत्या. पोउपनि दत्तात्रय काळे यांचे पथक बसस्थानक परिसरात वॉच ठेवून होते. त्याचदरम्यान चोरट्यांच्या टोळीची माहिती मिळाली. त्यावरून दुर्गा मोहन हातंवळणे (रा. रमाईनगर, देगलूर), हिवराज रामचंद्र उपाध्य, बालाजी उर्फ बली गोविंद नाळगिरे (दोघे, रा. देगलूर) आणि प्रकाश तुकाराम वाघमारे (रा. कळसदाळ, ता. भालकी) या चार जणांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून साडेसहा लाख रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले.

### १४ ठाण्यांत आहेत गुन्हे दाखल

- या टोळीने बारड, इतवारा, शिवाजीनगर, वजिराबाद, कंधार, लोहा, माळाकोळी आणि माहूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत महिलांचे दागिने लांबविले आहेत.
- त्यांच्यावर या ठाण्यांमध्ये गुन्हेही दाखल आहेत. आणखी काही गुन्ह्यांत आरोपींचा सहभाग आहे काय, याचाही तपास सुरु आहे.